नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २९० Issue - 290 | वार शनिवार दि. ८ मार्च २०२५ Blow- Saturday Date 8 March 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com


## सोलापूरच्या समान पाणी वितरणासाठी आराखडा तयार करा : मुख्यमंत्री फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सोलापूर शहरासाठीचा पाणीपुरवठा सुधारण्यासाठी नवीन जलवितरण प्रणाली आणि वाढीव जलसाठवण क्षमता निर्मितीसाठीचा प्रकल्प टप्पा २ तातडीने पूर्ण करण्यासाठीच्या कार्यवाहीस गती द्यावी. तसेच सोलापूरवासियांना समसमान पाणी वितरणासाठीचा आराखडा तयार करून ही कामे पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सोलापूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजना संदर्भात विधानभवन येथे बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी नागरिकांना तातडीने पाणी मिळावे, यासाठी कार्यवाही करण्यासंदर्भात निर्देश दिले.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शहरास होणारा अपुरा पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी आणि समसमान पाणी वितरण प्रणाली राबविण्यासाठी आराखडा तयार करावा. नवीन उच्चस्तरीय जलकुंभ पहिल्या टप्प्यात व १३ नवीन उच्चस्तरीय जलकुंभ बांधणे तसेच नवीन जलवाहिन्या, मोठ्या व्यासाच्या पाईपलाईन आणि वाढीव पंपिंग क्षमता उभारण्यासाठी कार्यवाही करावी. तसेच पाकणी येथे ६६ द.ल.ली. क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्र बांधण्याच्या प्रकल्प कामातील भू-संपादनाची प्रक्रिया जलदगतीने करावी जेणेकरून समांतर जलवाहिनी प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होऊ शकेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

बैठकीस पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, प्रधान सचिव डॉ. के.एच.गोविंदराज, नियोजन विभागाचे अपर मुख्य डॉ. राजगोपाल देवरा, सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सोलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, नगरपरिषदेचे आयुक्त मनोज रानडे उपस्थित होते.

## पाच वर्षांत वीजदरात २४ टक्क्यांपर्यंत कपात

### मुख्यमंत्र्यांची घोषणा; घरगुती ग्राहकांना दिलासा देण्याचा प्रयत्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





मुंबई : राज्यात गेल्या १० वर्षांतील सर्वाधिक एक लाख ३९ हजार ४३४ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक ही अवघ्या नऊ महिन्यांत आली आहे. गुंतवणुकीच्या क्षेत्रात राज्याने २०१६चा स्वतःचाच विक्रम मोडला असून, जनाधाराचा सन्मान करताना येत्या पाच वर्षांत घरगुती ग्राहकांच्या वीजदरात २४ टक्क्यांपर्यंत कपातीची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत केली. वीजकपातीबरोबरच 'स्मार्ट' मीटर बसविणाऱ्या ग्राहकांना दिवसा वापरलेल्या विजेवर १० टक्के सवलत देण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली.

राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनातील चर्चेच्या उत्तरात फडणवीस यांनी राज्यापुढील प्रश्न व ते सोडविण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती दिली. राज्यात गेल्या काही वर्षांपासून घरगुती विजेच्या दरात दरवर्षी साधारणतः नऊ टक्क्यांनी वाढ होत आहे. मात्र आता दरात वाढ होऊ न देता येत्या पाच वर्षांत त्यामध्ये कपात केली जाणार आहे. त्यानुसार १०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठी २४ टक्के, तर १०० ते ३०० युनिट वापरासाठीचे दर १७ टक्क्यांनी कमी केले जाणार आहेत. राज्यातील ९५ टक्के घरगुती ग्राहकांना वीजदरकपातीचा थेट लाभ मिळणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.ग्राहकांनी स्मार्ट मीटर बसवले, तर दिवसा वापरलेल्या विजेवर १० टक्के सवलत मिळेल. प्री-पेड मीटर ऐच्छिक स्वरूपाचे ठेवण्यात आले असून ग्राहकांना पोस्टपेड मीटरचा पर्याय उपलब्ध असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

अन्य घोषणा - शेतकऱ्यांचे ७५ हजार कोटींचे थकीत वीज बिल हळूहळू फेडण्याची योजना.

- प्रधानमंत्री आवास योजनेतील २० लाख घरांना मोफत सौरऊर्जा

- 'सूर्यघर'च्या माध्यमातून ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज

**'महावितरण शेअर बाजारात'**

महाराष्ट्र वीज वितरण कंपनी शेअर मार्केटमध्ये सूचिबद्ध करण्याचा शासनाचा आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. असे झाल्यास महावितरण शेअर मार्केटमध्ये सूचिबद्ध होणारी देशातील पहिली वीज वितरण कंपनी ठरणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

मागील सरकारच्या अडीच वर्षांच्या काळात घेतलेल्या सर्व निर्णयांची जबाबदारी आम्हा तिघांची आहे. या योजनांना स्थगिती देण्याबाबत खोटा प्रचार केला जात आहे. योजनांना स्थगिती द्यायला आपण काही उद्धव ठाकरे नाही, असा टोलाही फडणवीस यांनी लगावला.

## धारावी पुनर्विकास प्रकल्पाला 'जैसे थे' आदेश देण्यास नकार; राज्य सरकार, अदानी समूहाला सर्वोच्च न्यायालयाची नोटीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पाला 'जैसे थे' आदेश देण्यास सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी नकार दिला. सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठाने उच्च न्यायालयाच्या २० डिसेंबर २०२४ च्या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिकेवरून महाराष्ट्र सरकार तसेच अदानी समूहाला उत्तरही सादर करण्याचे निर्देश दिले. या प्रकल्पासाठी अदाणी समूहाची निविदा मंजूर करण्यात आली आहे.

उच्च न्यायालयाने धारावीत पुनर्विकासाचा मार्ग मोकळा केला होता व या प्रकल्पासाठी अदानी समूहाला दिलेली निविदा कायम ठेवली होती. सुनावणीदरम्यान, उच्च न्यायालयाने संयुक्त अरब अमिरात (यूएई) येथील सेकलिंक टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशनची याचिका फेटाळली होती.

या प्रकल्पासाठी अदानी समूहाने ५,०६९ कोटी रुपयांची बोली लावली होती. २०१८ मध्ये सेकलिंक टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशनने ७,२०० कोटी रुपयांचा प्रस्ताव देत या प्रकल्पासाठी सर्वाधिक बोली लावली होती, परंतु नंतर सरकारने ही निविदा रद्द केली. या याचिकेवर नोटीस बजावताना खंडपीठाने अदानी समूहाला एकाच बँक खात्यातून प्रकल्पासाठी निधी देण्याचे निर्देश दिले. सुनावणीदरम्यान 'सेकलिंक'च्या वतीने उपस्थित असलेले वरिष्ठ वकील सी. आर्यमा सुंदरम यांनी न्यायालयाला यथास्थिती आदेश देण्याची विनंती केली. तथापि, सरन्यायाधीशांनी ती फेटाळली. याचिकाकर्त्या कंपनीने पहिल्या निविदेत ७२०० कोटींचा प्रस्ताव दिला होता त्यात २० टक्के वाढ करण्याची तयारी असल्याचा युक्तिवादही त्यांनी यावेळी केला. त्यावर न्यायालयाने त्यांना प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले. या प्रकरणावर पुढील सुनावणी मे महिन्यात शेवटच्या आठवड्यात होणार आहे.

**राज्यात महिला सशक्तीकरणाला गती**

**आईचे नाव प्रथम लावण्याचा ऐतिहासिक निर्णय**

## महिला दिनानिमित्त अडीच कोटी लाडक्या बहिणींना मिळणार लाभ : मंत्री आदिती तटकरे

मुंबई, दि. ०७ : राज्यात महिलांच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक सक्षमीकरणासाठी विविध महत्त्वपूर्ण योजना राबविल्या जात आहेत. महिला आज सर्वच क्षेत्रांत आपले कर्तृत्व सिद्ध करत असून, शिक्षण, राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा, सहकार, मनोरंजन, प्रशासन, अर्थकारण आणि सामाजिक कार्य या क्षेत्रांत आपल्या क्षमतेला न्याय देत आहेत. महिला सशक्तीकरण हा केवळ चर्चेचा विषय न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने प्रभावी पावले उचलली असून महिला दिनानिमित्त अडीच कोटी लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात फेब्रुवारी व मार्च महिन्याचा लाभ मिळणार असल्याचे महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

जागतिक महिला दिन आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रि शताब्दी जन्मवर्षानिमित्त विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी प्रस्ताव मांडला होता. यावर महिला व बाल विकासमंत्री अदिती तटकरे यांनी विधानसभेत उत्तर दिले.

**मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना**

राज्यातील माता-भगिनींना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी राज्य शासनाने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना सुरू केली आहे. महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासोबतच त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करून कुटुंबातील महिलांची निर्णायक भूमिका अधिक बळकट करण्याचा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेंतर्गत अडीच कोटींहून अधिक महिलांना थेट लाभ मिळत आहे.

**आईचे नाव प्रथम लावण्याचा ऐतिहासिक निर्णय**



मे २०२४ पासून जन्मलेल्या बालकांच्या नावाच्या आधी आईचे, नंतर वडिलांचे नाव आणि शेवटी आडनाव लावण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. आई आणि वडील हे समान आहेत, हा संदेश समाजात रुजवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्णयाचे महत्त्व स्पष्ट केले आहे.

**महिला विशेष ग्रामसभा**

महिला सशक्तीकरणाच्या दृष्टीने यावर्षीपासून ८ मार्च रोजी महाराष्ट्रातील प्रत्येक गावात महिला विशेष ग्रामसभा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या विशेष ग्रामसभेत महिलांचे प्रश्न, स्थानिक विकास आणि विविध शासकीय योजनांचा आढावा घेतला जाणार आहे.

**महिलांसाठी आरोग्य आणि सुरक्षेच्या उपाययोजना सर्व्हायकल कॅन्सर लसीकरण**

९ ते १४ वयोगटातील मुलींना ही लस मिळावी यासाठी ५० ते ५५ लाख मुलींना लसीकरण करण्याचा प्रस्ताव आरोग्य व महिला आणि बाल विकास विभागाने तयार केला आहे. महिलांच्या आरोग्य संरक्षणासाठी सर्व्हायकल कॅन्सर प्रतिबंधात्मक लसीकरण कार्यक्रम राबवण्याचीही घोषणा करण्यात आली.

**लाडक्या बहिणींसाठी आरोग्य तपासणी शिबिरे**

अंगणवाडी सेविकांसाठी सुरू केलेल्या हेल्थ चेकअप कॅम्पच्या धर्तीवर महिलांसाठी परमनंट हेल्थ कार्ड आणि आरोग्य तपासणी शिबिरे राबवण्यात येणार आहेत.

**महिलांसाठी महामार्गावर स्वच्छतागृहे**

महिला प्रवाशांची सुरक्षितता आणि सुलभता लक्षात घेऊन महामार्गांवर दर २५ ते ५० किलोमीटर अंतरावर महिलांसाठी शौचालये उभारण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने मंजूर केला आहे.

**महिलांसाठी रोजगार आणि निवास सुविधा पिंक ई-रिक्षा योजना**

पिंक ई-रिक्षा योजनेसाठी ४ ते ५ हजार अर्ज प्राप्त झाले असून, यंदाच्या वर्षात १०,००० महिलांना ई-रिक्षा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. यामुळे महिलांना स्वयंरोजगाराची संधी मिळणार आहे.

**वर्किंग वुमन हॉस्टेल्स**

सध्या राज्यात वर्किंग वुमन हॉस्टेल्स ७४ कार्यरत असून, आणखी ५० नवीन हॉस्टेल मंजूर करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**महिला सशक्तीकरणासाठी 'आदिशक्ती समिती'**

प्रत्येक गावात महिला ग्रामपंचायत समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही समिती महिला आणि मुलींना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी काम करेल.

हे शासन महिला सशक्तीकरणासाठी पूर्णतः कटिबद्ध असून, महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासासाठी भविष्यातही महत्त्वपूर्ण निर्णय घेत राहील, असे मंत्री तटकरे यांनी सांगितले.




दैनिक
# यश सिद्धि न्यूज



**संपादकीय....**

## सर्वोच्च न्यायालयाची नोटीस

मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पाला 'जैसे थे' आदेश देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठाने उच्च न्यायालयाच्या २० डिसेंबर २०२४ च्या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिकेवरून महाराष्ट्र सरकार तसेच अदानी समूहाला उत्तरही सादर करण्याचे निर्देश दिले. या प्रकल्पासाठी अदाणी समूहाची निविदा मंजूर करण्यात आली आहे. उच्च न्यायालयाने धारावीत पुनर्विकासाचा मार्ग मोकळा केला होता व या प्रकल्पासाठी अदानी समूहाला दिलेली निविदा कायम ठेवली होती. सुनावणीदरम्यान, उच्च न्यायालयाने संयुक्त अरब अमिरात (यूएई) येथील सेकलिंक टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशनची याचिका फेटाळली होती. या प्रकल्पासाठी अदानी समूहाने ५,०६९ कोटी रुपयांची बोली लावली होती. २०१८ मध्ये सेकलिंक टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशनने ७,२०० कोटी रुपयांचा प्रस्ताव देत या प्रकल्पासाठी सर्वाधिक बोली लावली होती, परंतु नंतर सरकारने ही निविदा रद्द केली. या याचिकेवर नोटीस बजावताना खंडपीठाने अदानी समूहाला एकाच बँक खात्यातून प्रकल्पासाठी निधी देण्याचे निर्देश दिले. याचिकाकर्त्या कंपनीने पहिल्या निविदेत ७२०० कोटींचा प्रस्ताव दिला होता त्यात २० टक्के वाढ करण्याची तयारी असल्याचा युक्तिवादही त्यांनी यावेळी केला.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



भिवंडी : गुंदवली ग्राम पंचायतीचे माजी उपसरपंच सुमित बाळ्या मामा म्हात्रे यांच्या वाढ दिवसाचे औचित्य साधून गुंदवली येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या व इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप बुधवारी करण्यात आले.यावेळी ग्राम पंचायतीचे उपसरपंच मनेष म्हात्रे यांच्यासह गावातील ग्रामस्थ व शिक्षक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्त्री जन्मा तुझी कहाणी हृदयी अमृत नयनी पाणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

स्त्री म्हणजे मातृत्व, कर्तृत्व, आणि चारित्र्य सांभाळत तारेवरची कसरत करत, पुरुषाच्याही आयुष्याला कलाटणी देणारी असते. आजची स्त्री ही शिकलेली घरातील कर्तव्य पार करून अडथळ्याची शर्यत पार करत करत नोकरी व्यवसायातही आपल्या ठसा उमटवणारी याचा एक स्त्री म्हणून नेहमीच आपण अभिमान बाळगला पाहिजे. स्त्रीने समाजात वावरत असताना नेहमी धीट आणि खमकेपणानं वागावं. आपल्या भारतीय इतिहासातील खमक्या स्त्रिया या नेहमी आदर्शच राहिले आहेत. अशी असंख्य उदाहरणे आहेत ज्यांनी आपले स्वतःचे एक वलय आपल्या बुद्धीच्या, तेजाच्या, आणि कर्तुत्वाच्या जोरावर सिद्ध करून दाखविले आहे.

आज आपण २१व्या शतकात वावरत असताना स्त्री आपला आहे की सबला? असा प्रश्न नक्कीच मनाला सतावून जातो, तसे पाहिले तर पुरातन काळात देखील स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार होता. गार्गी, मैत्रेयी ,लोपामुद्रा या विदूषी असो, किंवा आमच्या शिवरायांना घडविणाऱ्या राजमाता राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ असो , स्त्रीपुरुष तुलना हा ग्रंथ लिहून पुरुष जातीला घाम फोडणाऱ्या ताराबाई शिंदे असोत ,तुम्हा आम्हाला शिक्षणाची कवाडे खुली करणाऱ्या सावित्रीबाई फुले असोत ते आजच्या सर्व क्षेत्रातील यशस्वी स्त्रिया पर्यंत या सगळ्यांनी आपल्या स्त्रियांसमोर एक आदर्श ठेवून समाज घडवण्यासाठी प्रयत्न केले.

यत्र नार्यस्तु पुज्यन्ते रमते तत्र देवता : भारत हा जगातील असा देश आहे की जिथे स्त्री शक्तीची म्हणजे नारीची पूजा केली जाते परंतु शोकांतिका अशी आहे की सर्वात जास्त विटंबना आणि अवहेलना पण तिच्याच वाट्याला येते.आजची स्त्री शिकलेली, स्वतःची निर्णय क्षमता असलेली, स्वतःच्या पायावर उभी असलेली परंतु खरंच ती स्वतंत्र आहे का? की जन्माला आल्यापासून पिता, बंधु, पती आणि पुत्र यांच्या आधाराच्या कुबड्यांशिवाय ती समाजात बिनधास्त वावरू शकते का? समाजातील एखाद्या स्त्रीच्या पतीच्या निधनानंतर समाज तिला स्वस्थ असं सामाजिक जीवन जगू देतो का?याचे उत्तर नाही असेच आपल्याला मिळेल,मग त्या स्त्रीची इच्छा असो अथवा नसो तिच्याकडे वाईट नजरेने बघण्यासाठी टपलेल्यांची संख्या काही कमी नसते आणि समाजातील त्रास देणारे हे काही कमी नसतात.त्या स्त्रीने कितीही चांगले जीवन जगण्याचा प्रयत्न केला तरी समाज तिच्याकडे मात्र वाईट दृष्टिकोनातूनच बघणार... हा समाजाचा दृष्टिकोन कधी बदलणार कोण जाणे ...मग ती स्त्री खऱ्या अर्थानं स्वतंत्र कशी?कितीतरी स्रिया समाजाच्या भीतीपोटी आपल्यावर झालेले अन्याय, अत्याचार मुकाटपणे सहन करतात मग अशावेळी वाटतं महिला मुक्ती वगैरे या सर्व गोष्टी फक्त कागदापुरत्याच राहून जातात. हेच कशाला समाजही या अशा असंख्य गोष्टींकडे डोळे असून आंधळे झाल्यासारख्या दृष्टिकोनातून बघतो.त्यापैकी काही जणांनी आपले अन्याय अत्याचार उघड केले तर समाज त्यांच्याकडेच वाईट दृष्टिकोनातून बघतो. त्यामुळे अनेक घटना या जन लाजेमुळे दडवल्या जातात. जश्या नाण्याला दोन बाजू असतात तशा काही घटनांच्या बाबतीत होवू शकते,मग याला वाचा फोडणार कोण ?आणि या सर्व बाबीला जबाबदार कोण?.....तर आपणच निर्माण केलेली समाज व्यवस्था याला सर्वस्वी जबाबदार आहे.मुलगी जन्माला आल्यापासून तिला परक्याचं धन समजणारा आपला समाज कितीही शिकला तरी तो जोपर्यंत आपल्या या मानसिकतेत बदल करत नाही तोपर्यंत ५० टक्के महिलांना आरक्षण देऊनही खरी महिला मुक्ती किंवा प्रगती होणार नाही त्यासाठी गरज आहे ती परिवर्तनाची..आणि ते परिवर्तनही स्वतःपासूनच करण्याची....

इतिहास सांगतो आमच्या स्त्रीने शत्रू तुडवला,लक्ष्मीबाई ने झाशीचा किल्ला लढवला,माँसाहेब जिजाऊ ने राजा शिवछत्रपती घडवला,महाराणी ताराबाई ने महाराष्ट्र भूमीत औरंगजेब रडवला. इतिहासात डोकावून बघतांना आपल्या भारतभूमीत अशा असंख्य महिला होऊन गेल्या ज्यांनी आपण महिला आहोत– हे करू शकतो का?ही सामाजिक बंधने केव्हा झुगारून लावली, आपल्या सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणासाठी समाजकंटकांचे शेण, चिखल, मातीची ही पर्वा केली नाही.खऱ्या अर्थाने या माऊलीने आम्हा स्त्रियांवर अनंत असे उपकार करून ठेवले आहेत ज्यामुळे महिला आज समाजात चुल आणि मूल हे बंधन स्वीकारूनही समाजात ताठ मानेने वावरत आहेत. शिक्षणामुळेच अन्यायाला वाचा फोडण्यासाठी एकजूट होत आहेत ,रस्त्यावर उतरत आहेत, खरोखर हे केवळ शक्य झाले ते केवळ आमच्या माता माऊली सावित्रीबाई फुले..यांच्यामुळे,तसा विचार केला तर खरोखर स्त्री शिकली आणि प्रगती झाली.असा आपण मोठ्या अभिमानाने म्हणतो परंतु खरंच तसं झालंय का?–का फक्त नऊवारी, सहावारी ऐवजी सूट जीन्स–टॉप घालून केस तोकडे करून स्त्री ही फॉरवर्ड झाली. स्वातंत्र्य आणि स्वैराचार यातील फरक जिला कळाला तिचे आयुष्य मात्र सोन्याहूनही पिवळे झाले. कधी कधी रस्त्याने जाताना स्कुटी चालवत असतानाही डोक्यावरून पदर घेणारी एखादी स्त्री बघितली किंवा सणावाराला नऊवारी साडी नेसून डोक्याला फेटा बांधून नाकात नथ घालून फोटोत व पेपर मध्ये येण्यासाठी रॅलीत सहभागी होणारी बुलेट वर बसलेली स्त्री पाहिली की मनात हळूच विचार डोकावतो.... की खऱ्या अर्थाने स्त्री स्वतंत्र झाली का हो? याचे उत्तर न शोधलेलच बरं.. आजची शिक्षित झाली म्हणून तिला अबलाची सबला झाली असे म्हणतात.ती आज कायदा, न्यायव्यवस्था, वर्तमानातील घटना, इतिहास, भूगोल, भूतकाळ, भविष्य याबाबत सर्व जाणून असते, तरीही आजची स्त्री सुरक्षित नाही.अजूनही ती रात्रीचा एकटीने प्रवास करू शकत नाही. एवढेच कशाला नोकरी संपवून घरी आली तरी एका स्त्रीची नोकरी मात्र खऱ्या अर्थाने संपत नाही, घरातही तिची नोकरी सुरूच असते अगदी सुट्टीच्या दिवशीही ,एखाद दुसरी सोडली तर हे कुणाला ही चुकलेल नाही. पण घरात एका स्त्री शिवाय शोभा नाही.घराला घरपण आणणारी एक कन्या, बहिण, आई ,पत्नी, सून,मावशी, आत्या ,काकू, मामी, आजी यासारख्या असंख्य भूमिकेतून ती एकाच वेळे वावरत असते. आपल्याबरोबर आपल्या कुटुंबालाही सांभाळत असते हे केवळ एक स्त्रीच करू शकते.आणि याचा एक स्त्री म्हणून आपल्याला अभिमान देखील असावा.

महिला दिनाची सुरुवात ही पण हक्कासाठी महिलांना एकत्र येऊन लढा द्यावा लागला या एका घटनेतून झालेले आहे. महिलांनाआपल्या मागण्यासाठी त्यांना रस्ता उतरून आंदोलन करावे लागले.८ मार्च १८५७ रोजी न्यूयॉर्कमधील शिलाई मशीनच्या कारखान्यात काम करणाऱ्या स्त्रियांनी आपल्या हक्कासाठी एकत्रित येऊन रस्ता उतरून मोठे आंदोलन उभे केले.८ मार्च रोजी हे आंदोलन सुरू झाले त्यामुळे हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो.परंतु आमच्या संविधानात मात्र भारतातील स्त्रियांना न मागता मतदानाचा अधिकारही मिळाला आणि स्त्री आणि पुरुष यांना समान वेळ काम केल्यानंतर समान वेतन कायदा ही मंजूर झाला.



महिला दिनानिमित्ताने आपल्या समाजात गरज आहे ती परिवर्तनाची...समाजाच्या विचारांची दिशा बदलण्याची....चला तर मग याची सुरुवात आपण आपल्यापासूनच करूया आपले विचार बदलूया आणि स्वतःबरोबर समाजालाही बदलूया.

**– श्रीमती मनीषा गोराडे–वारुंगसे**
**उपशिक्षिका**
**मराठा विद्या प्रसारक समाजाचे**
**जनता विद्यालय कोमलवाडी,**
**ता .सिन्नर, जि. नाशिक**

# महिला दिन; महिला हक्क चळवळीतील केंद्रबिंदू



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दरवर्षी ८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो. सर्व प्रथम जागतिक महिला दिनाच्या सर्वांना शुभेच्छा. महिला हक्क चळवळीतील केंद्रबिंदू म्हणून हा दिवस पाळला जातो. हा दिवस लिंग समानता, पुनरुत्पादक हक्क आणि महिलांवरील हिंसा आणि अत्याचार यासारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करतो. सार्वत्रिक महिला मताधिकार चळवळीमुळे उत्तेजित करणारा हा दिवस. २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात उत्तर अमेरिका आणि युरोपियन मधील कामगार चळवळींमधून हा दिवस सुरू झाला. महिला दिन हा आपल्या स्त्रीत्वाचा अभिमान बाळगून त्याचा गौरव करण्याचा दिवस आहे. हा सन्मान करताना एकदा हा विचार नक्कीच करावा की खरंच आपल्या देशातील गावातील कुटुंबातील आमची लेक, आमची आई, आमची बहीण सुरक्षित आहे का? तर नक्कीच नाही. याला कारण आपला समाज. तिच्यावर अनेक अन्याय अत्याचार होताना पाहायला मिळतात. त्याला अनेक घटक जबाबदार आहेत. ते म्हणजेच स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन. तो जर बदलायचा असेल तर माझी तमाम लेकिना, मातांना विनंती की तासंतास सोशल मीडियाच्या माध्यमाच्या नादी लागून रिल्स शॉर्टस यात वेळ न घालवता स्वविकास करण्यावर भर दिला पाहिजे. त्यात प्रमुख्याने योग साधना, कराटे, लाटी–काटी, दांडपट्टा, तलवारबाजी यासारखी प्रशिक्षण घेऊन स्वतः रणरागिनी बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे. झाशीची राणीने पाठीवर बाळ घेऊन इंग्रजाना सालो कि पळो करून सोडले होते. दुर्गे प्रमाणे समाजातील अनिष्ठ रूढी तथा समाजातील म्हैसासुराचं वध करण्याचे स्वतः मध्ये धाडस निर्माण केले पाहिजे. महिला आनंदी राहिल्या तरच त्या एक चांगली आई होऊन शूर शिवाजी निर्माण करतील. संयमी रमा होऊन बाबासाहेब बनवतील. समाजाचे शेणाचे घाव सोसून जोतिबाची सावित्री होतील. स्मशानाची तमा न बाळगता जगाची माय सिंधुताई होईल. नारी तू घे अशी भरारी फिरून पाहू नकोस माघारी. म्हणून माझ्या सावित्रीच्या लेकींना सांगावेसे वाटते की ताई तू संकटानपुढे रडली नाहीस तर तू लढली पाहिजेस. मोबाईल सारख्या तंत्रज्ञाचा योग्य वापर करता आला पाहिजे. वेळीच जागे होऊन आपल्या मुलांना वेळ द्यावा. वाचन लेखनातून वैचारिक प्रगलभता निर्माण झाली पाहिजे. स्वतः मध्ये धाडस निर्माण करून बालपणनाटच चांगले संस्कार देता आले पाहिजे. आपल्या लेकींना शूर व धाडसी बनवा तरच त्या या समाजात ताट मानाने जगतील. कुठल्याच अत्याचाराला बळी पडणार नाहीत व संस्कारी व पिढी घडेल. त्यासाठी आठ मार्चला महिलांचा सन्मान करताना तो आपल्या कुटुंबापासून करून एक आदर्श निर्माण केला पाहिजे. प्रत्येक स्त्री ही आपली माता भगिनी मांनली तर तिचे खच्चीकरण होणार नाही. ती कधीच कुठे कमी पडणार नाही व आपल्या देशाचे नाव उज्वल करेल. आणि तेव्हाच खऱ्या अर्थाने महिला दिन साजरा होईल. पुन्हा एकदा सर्व महिलांना जागतिक महिला दिनाच्या खूप शुभेच्छा.



**– श्रीमती तारा सलवदे – धावारे**
**सहशिक्षिका (योगशिक्षिका)**
**विद्या साधना प्रशाला, वैराग ता. बार्शी**

# आजची स्त्री आणि वास्तव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



प्रथम जागतिक महिला दिनानिमित्त सर्व महिलांना खूप खूप शुभेच्छा!

स्त्री म्हणजे परमेश्वराची एक अप्रतिम अशी कलाकृती. अशी कलाकृती की तिच्याविषयी लिहायला गेल की प्रश्न पडतो काय लिहावं आणि काय नाही? अशी ही शब्दात न मानणारी स्त्री. जीवनाच्या प्रवासात अनेक प्रकारच्या भूमिका पार पाडत असते. आई ती, बहिण ती, मैत्रीण ती, पत्नी ती, संसाराच्या गाड्यांचं एक चाक ती तरीही दोन्ही चाकांप्रमाणे संसारात समतोल राखते. अशी ती पूर्णांगिनी आणि सर्वस्व ही तीच. तरीही समाज मात्र तिचे शोषणच करत आलेला आहे. तिच्यावर अत्याचार करून, तिच्या हाल अपेष्टा करून तिचे जगणे असह्य करून टाकतो. पूर्वीच्या काळी ही तीच जगणं ही क्षणाक्षणाला मरणच होत कारण त्यावेळी तिला शिक्षणाचा अधिकार न्हवता, स्वतःच्या घरात आणि समाजात तीच स्वतःच अस कुठलच स्थान न्हवत. सतीची चाल अस्तित्वात होती. आपली संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती असल्याने स्त्री ही एक उपभोगाची वस्तु समजल्या जायची.

आज आपण एकविसाव्या शतकात आहोत. सगळ्या वाईट प्रथा परंपरा काही अंशी बंद झाल्या आहेत. स्त्रीला शिक्षणाचा अधिकार मिळाला आहे.

जग बदलतंय, विज्ञानाच्या प्रगतीने अवकाशाला गवसणी घातलीय, पण आजही स्त्रीच्या सुरक्षिततेचा प्रश्न सुटलेला नाही. तिला मिळणाऱ्या संधींवर अजूनही बंधनं आहेत, तिच्या आयुष्याच्या निर्णयांवर अजूनही दुसऱ्यांचाच हक्क आहे. एकीकडे आपण महिला सबलीकरणाच्या घोषणा करतो, तर दुसरीकडे आजही कुठेतरी एक मुलगी तिच्या अस्तित्वासाठी झगडतेय.

स्त्री सुरक्षित आहे का? हा प्रश्न आपण कित्येक दशकांपासून विचारतोय, पण आजही या प्रश्नाचं उत्तर स्पष्ट नाही. घरात, रस्त्यावर, कार्यस्थळी, शिक्षण संस्थांमध्ये, अगदी सोशल मीडियावरही स्त्रियांना त्रास दिला जातो. लैंगिक अत्याचार, कौटुंबिक हिंसा, छेडछाड, दुय्यम वागणूक, मुलगी म्हणून जन्मालाच नको म्हणून केलेली गर्भपातं–ही सर्व परिस्थिती अजूनही अस्तित्वात आहे.

स्त्री शिक्षण घेत आहे, नोकरी करत आहे, स्वतःचा व्यवसाय उभारत आहे, पण तिच्यावरचे बंधन अजूनही सुटलेले नाहीत. स्त्री कितीही स्वतंत्र झाली तरी तिच्या सुरक्षिततेचा प्रश्न कायम आहे.

स्त्री दुबळी नाही, पण समाज तिच्या शक्तीला ओळखायला तयार आहे का? हा खरा प्रश्न आहे.


स्त्रीवर अन्याय – तरी दोष तिचाच?

स्त्रीवर अत्याचार झाला, अन्याय झाला, तरी जग समाज स्त्रियांना बदनाम करत असतात .

प्रश्न पडतो तो म्हणजे

स्त्री यांच्या सौंदर्याचा भारतीय स्त्रियांचे सौंदर्य

स्त्रियांचे सौंदर्य हे दिसण्यापेक्षा असण्यात जास्त असते. दिसणे, भासने आणि असणे यात खूप फरक आहे. स्त्री चे वान, रंग,रूप हे न पाहता तिच्या गुणाला संस्काराला प्राध्यान्य दिले पाहिजे.भारतीय स्त्रीयांचे सौंदर्य हे जरी स्त्रीयांच्या बाह्य (शारीरिक ) रुपात पाहिले जात असले तरी त्यांचे खरे सौंदर्य हे त्यांच्या अंगी असलेल्या विविध कलागुण आणि आदर्श वर्तन यात लपलेले असते म्हणुनच स्त्रियांना सौंदर्याची मूर्ती आणि रत्नाची खाण म्हटले जाते. स्त्रियांना देवी बरोबरच माता, भगिनी आणि पत्नी या प्रमुख तीन रूपात पाहिजे जाते. स्त्रीयांच्या अंगी असलेले विविध कला, गुण, कौशल्य, सद्गुण, वर्तन, आचार, विचार, कार्य, कर्तुत्व, शील, चारित्र्य, चातुर्य, बुध्दी, शक्ती, युक्ती, भक्ती, संयम आणि सौजन्यशीलता यातून खरे सौंदर्य खुलून दिसते आणि हेच खरे स्त्रियांचे सौंदर्य असते. याच सौंदर्याने स्त्रीया या रूपवान आणि गुणवान दिसतात यात शंकाच नाही. या सर्व गुणांचा सारांश म्हणजे स्त्रियांच्या अंगी असलेल्या संस्कारातूनच त्यांचे सौंदर्य पाहायला आणि अनुभवायला मिळते . आणखी एक स्त्रियांना राजकारणामध्ये किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात असणारे स्थान हे उच्च आहे तिने स्वताने पुढे येऊन भाग घेतला पाहिजे .



**मां प्रा श्री काशिनाथ आटपाडकर**
**कुरणेवाडी ता.माण**
**जि.सातारा**

# बिईंग सक्सेसफूल आंत्रेप्रेन्यूअर नियतकालिक नवोदित उद्योजकांनी आवर्जून वाचावे : मिलिंद कांबळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई– बिईंग सक्सेसफूल आंत्रेप्रेन्यूअर या संस्थेतर्फे शनिवारी चेंबूर येथे यशस्वी उद्योजकांना गौरविण्यात आले. यावेळी डिक्की अर्थात दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे संस्थापक अध्यक्ष व उद्योजक पद्मश्री मिलिंद कांबळे, बिईंग सक्सेसफूल आंत्रेप्रेन्यूअरचे सर्वेसर्वा अरुण धनेश्वर, चेतना कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्चच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ मधुमिता पाटील, चेतना आर. के इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट रिसर्चच्या संचालिका डॉ नंदिता मिश्रा, सिने कलाकार साहिला छड्डा आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी बिईंग सक्सेसफूल आंत्रेप्रेन्यूअर या नियतकालिकाचे प्रकाशन मिलिंद कांबळे आणि अन्य उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच १३ यशस्वी उद्योजकांना पद्मश्री मिलिंद कांबळे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात देखील आले. यामध्ये तन्वी इंजीनियरिंग कॉर्पोरेशनचे सुनील शिंदे, बिझ क्राफ्ट सोल्यूशन्स प्रा. लिचे संतोष कांबळे, सूपर्ब ग्रुपचे सुगात वाघमारे, सर्वेश एक्सप्रेस प्रा. लिचे संजय परब आणि विद्या परब, अन्नपूर्णा पर्सच्या उज्वला कांबळे, इलेक्ट्रोफाइन रिसायकलिंगच्या वैशाली स्वरूप, झिव्हट्रिक्स कॉर्पोरेट सर्विसेस प्रा.लिचे दिपेश मढकर, क्लेंझो एक्सप्रेस लॉण्ड्रीचे निलेश भोईर व प्राची भोईर, नाईस स्टील इंडियाचे खुशाल लाहोटी, मेटा क्राफ्ट इंडस्ट्रीजचे मिलिंद वायदंडे आणि निलेश वायदंडे, आरएनआर स्टोअरचे यश राठोर, युक्ती मिडिया कन्सल्टन्सीचे प्रमोद सावंत व अर्चना सोंडे आदी उद्योजकांचा या सत्कारमूर्ती मध्ये समावेश होता.



यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पद्मश्री मिलिंद कांबळे म्हणाले की, ''सूक्ष्म, लघू, मध्यम उद्योजक हा भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया आहे. हेच क्षेत्र मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करते. भारताच्या जीडीपी मध्ये देखील मोठ्ठे योगदान देते. आजच्या काळात कधी नव्हे ते माहिती तंत्रज्ञानाचे जाळे विस्तारलेले आहे. मोबाईल हे निव्वळ संवादाचे साधन राहिले नसून तुमचे आधुनिक शस्त्र बनले आहे. कृत्रिम प्रज्ञा वापरुन निमिषार्धात पाहिजे ती माहिती उपलब्ध होऊ लागली आहे. सभोवताली रोजगाराच्या उदंड संधी उपलब्ध असताना जर कोणी बेरोजगार असेल तर तो स्वेच्छेने बेरोजगार आहे असे मी मानतो''. यावेळी त्यांनी बिईंग सक्सेसफूल आंत्रेप्रेन्यूअर या नियतकालिकाचे प्रकाशन केल्याबद्दल अरुण धनेश्वर यांना शुभेच्छा दिल्या.

नवउद्योजकांच्या मनात उद्योग सुरू करताना अनेक प्रश्न असतात. हे प्रश्न त्यांना कोणत्याही पुस्तकातून मिळण्याची शक्यता कमी असते. मात्र अनुभवाच्या शाळेतून तावून सुलाखून निघालेले उद्योजक या प्रश्नांची उत्तरे जाणतात. त्यांचा अनुभव नवउद्योजकांना दीपस्तंभ ठरावा या हेतूने बिईंग सक्सेसफूल आंत्रेप्रेन्यूअर या नियतकालिकाची निर्मिती केल्याचे अरुण धनेश्वर यांनी म्हटले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध वृत्तनिवेदक मिलिंद भागवत यांनी केले तर आभार प्रदर्शन चेतना महाविद्यालयाचे प्राध्यापक संदीप नेमळेकर यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# माढा व पंढरपूरच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार अभिजीत पाटील यांचे शर्तीचे प्रयत्न

## विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनात मतदार संघाच्या समस्यांकडे आ. अभिजीत पाटील यांनी वेधले लक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघाचे नूतन आमदार अभिजीत पाटील यांनी मतदार संघातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांकडे लक्ष वेधून घेत हिवाळी अधिवेशनानंतर पार पडत असलेल्या विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनातही मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण मागण्या केल्या.

सध्या उन्हाचा कडाका वाढत चालल्याने पाण्याचा प्रश्न भेडसावू नये यासाठी माढा तालुक्यातील पाणीप्रश्न सोडवण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात,

माढा तालुक्यातील नागरिकांना दर १० ते १२ दिवसांतून एकदा पाणीपुरवठा केला जातो या संदर्भात तातडीने उपाययोजना कराव्यात. आष्टी तलाव व दारफळ-सीना माढा प्रकल्प या दोन्ही स्रोतांचा समन्वय करून माढा शहर व तालुक्याला कायमस्वरूपी पाणीपुरवठा करावा.

यासाठी आवश्यक पाणीपुरवठा योजनांना तात्काळ मंजुरी मिळावी व निधी उपलब्ध करून द्यावा.

माढा तालुक्यात नवीन पोलीस स्टेशन आणि उपविभागीय पोलीस कार्यालय स्थापन करावे.

माढा तालुक्यात सध्या माढा, कुर्डूवाडी आणि टेंभुर्णी ही तीन पोलीस ठाणी कार्यरत आहेत. मात्र मोडनिंब पोलीस स्टेशनचा प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे तो तातडीने मंजूर करून या परिसरातील कायदा-सुव्यवस्था मजबूत करावी.

सध्या माढा तालुक्याचा काही भाग बार्शी व करमाळा या ठिकाणी जोडला जातो. त्यामुळे स्थानिक नागरिकांची गैरसोय होते. यासाठी माढा येथे कार्यालय आणि स्वतंत्र युनिट स्थापन करावे.

टेंभुर्णी पोलीस ठाण्यासाठी नवीन इमारतीची गरज आहे. या ठिकाणी ५ एकर जागा उपलब्ध असून त्याचा वापर आदर्श पोलीस स्टेशन उभारण्यासाठी करावा. तसेच पोलीस वसाहत, वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी निवासस्थान आणि आधुनिक सुविधा असलेले पोलीस स्टेशन यासाठी निधी मंजूर करावा.

याचबरोबर माढा व पंढरपूर परिसरातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचे सुशोभीकरण करावे, यामध्ये भुईकोट किल्ला, माढा येथील छत्रपती शिवरायांचे जावई निंबाळकर यांच्या समाधीचे सुशोभीकरण करण्यासाठी निधी मंजूर करावा.

मनकर्णिका नदीचे सुशोभीकरण करणे आवश्यक आहे. नगर विकास खात्यामार्फत या नदीला कॅनॉलचा दर्जा मिळावा आणि तिचा विकास करण्यात यावा.

माढेश्वरी तीर्थक्षेत्राचा विकास करणे गरजेचे आहे. पंढरपूरपासून जवळ असलेल्या या महत्त्वाच्या स्थळासाठी ५ ते ७ लाख भाविक दरवर्षी भेट देतात. त्यामुळे पर्यटनवाढीसाठी आवश्यक निधी मंजूर करावा.

माढा व पंढरपूर शहरासाठी रिंग रोड व पायाभूत सुविधांचा विकास करावा.

माढा शहरासाठी रिंग रोड तयार करण्याची गरज आहे, यामुळे रहदारीचा प्रश्न सुटेल.

पंढरपूर शहरातही रिंग रोड आवश्यक आहे, कारण लाखो भाविक दरवर्षी येथे येतात आणि रहदारीच्या समस्येला सामोरे जावे लागते. माढा शहरातील रस्ते, पथदिवे, सीसीटीव्ही कॅमेरे यासाठी निधी मंजूर करावा.

पंढरपूर येथील पाणीपट्टी कमी करावी.

माढा व पंढरपूर शहरातील आरोग्य व गृहप्रकल्पांचे प्रश्न निकाली काढावेत.माढा ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा वाढवून उपजिल्हा रुग्णालय करण्यात यावे.पंतप्रधान आवास योजनेंतर्गत ८९२ घरांचे काम पूर्ण होण्यासाठी निधी मिळावा.पंढरपूर येथील नाम किर्तन सभागृहाच्या कामात निष्कृष्ट दर्जाचे काम झाले असून चौकशी करून नवीन निविदा मंजूर करावी.




माढा तालुक्यात छत्रपती शिवरायांचा अश्वारूढ पुतळा नाही, त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर,अण्णाभाऊ साठे, अहिल्यादेवी होळकर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मारकांसाठी निधी उपलब्ध करावा.

पंढरपूर शहरात सावित्रीबाई फुले आणि अहिल्याबाई होळकर यांचे स्मारक उभारण्यासाठी निधी मंजूर करावा.

पंढरपूर शहरात तीन पोलीस ठाणी आहेत - ग्रामीण एक, ग्रामीण दोन आणि शहर पोलीस स्टेशन, परंतु पोलिसांची संख्या कमी आहे. ताण कमी करण्यासाठी पोलिसांची संख्या वाढवण्यात यावी.

पंढरपूर पोलीस वसाहतींची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. नवीन वसाहती उभारून पोलीस कर्मचाऱ्यांसाठी उत्तम सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

या मागण्यासाठी विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार अभिजीत पाटील यांनी आवाज उठून लक्ष वेधून घेतल्याने लवकरच यासाठी निधी मिळेल अशी अपेक्षा निर्माण झाली आहे.

## थोडक्यात...




### विवाहितेचा छळ; पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा

सोलापूर : माहेरुन बांधकामासाठी पाच लाख रुपये घेऊन ये म्हणत विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याची घटना २१ नोव्हेंबर २०२१ ते १२ मे २०२४ पर्यंत सासरी घडली. या प्रकरणी पौर्णिमा अभिषेक शिंदे (वय २०, रा. जय मल्हार चौक, बुधवार पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पती अभिषेक शिंदे, सासू शारदा, दीर तन्मय, ननंद सिद्धी जाधव, चुलत दीर रोहन पवार (सर्व रा. सोलापूर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, फिर्यादी या सासरी नांदताना संशयित आरोपींनी फिर्यादीस मी पूर्वीपासून विवाहित आहे मला दोन मुल आहेत. तुला मी फक्त मोलकरीण म्हणून आणलो आहे. तसेच रोहन पवार यांनी अभिषेक शिंदे याला तू कशाला हिच्यासोबत लग्न केला, तु हिला सोडचिठ्ठी दे, सोडून टाक असे म्हणून फिर्यादीस त्रास देत जाचहाट करून मारहाण केली. तसेच अभिषेक शिंदे याचे पूर्वीचे लग्न केल्याचे लपवून फिर्यादी सोबत दुसरे लग्न केले आहे असे फिर्यादीत नमूद आहे.

# विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन वैज्ञानिक बनावे : पुजा कडबगावकर



### कल्याणशेट्टी हायस्कूल मध्ये सी व्ही रमण जयंती निमित्त विज्ञान दिवस साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन वैज्ञानिक बनावे असे मत विज्ञान शिक्षिका पुजा कडबगावकर यानी व्यक्त केल्या.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात थोर वैज्ञानिक सी व्ही रमण यांच्या जयंती निमित्त आयोजित विज्ञान दिवस कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी विज्ञानाची कास धरावी, अंधश्रद्धेवर विश्वास न ठेवता वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून उच्च शिक्षण घ्यावी आणि वैज्ञानिक होण्याचे स्वप्न बाळगावेत.

प्रारंभी वैज्ञानिक सी व्ही रमण यांच्या प्रतिमेस मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी कु अक्षता साठे, कु.स्मिता बिराजदार या विद्यार्थिनींनी थोर शास्त्रज्ञ सी व्ही रमण यांच्या विषयी माहिती दिली.यानंतर प्रश्नमंजुषा स्पर्धेत यशस्वी विद्यार्थी अतुल कारंजे, संस्कृति बिराजदार, आदिती बाणेगाव, अनमोल आडवीतोट, सुलक्ष्मी टाके याना पारितोषिक देण्यात आले. तसेच पोस्टर प्रदर्शनात प्रीती फुलारी, लक्ष्मी किणगी, लक्ष्मी भूशेट्टी या यशस्वी विद्यार्थिनींना पारितोषिके देण्यात आली.

या कार्यक्रमास पर्यवेक्षक सूर्यकांत रुगे, श्रीदेवी मायनाळे, कल्पना स्वामी, शरणबसप्पा चानकोटे,सेमी विभागाचे दिगंबर जगताप, विज्ञान शिक्षक रवीकिरण दंतकाळे, सिद्रामप्पा पाटील, सागर मठदेवरू, शितल फुटाणे, विद्याश्री वाले आदी शिक्षक उपस्थित होते.



# औसा खरेदी विक्री संघाच्या संचालकपदी बालाजी धुमाळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आपचुंदा गावचे सुपुत्र तथा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे कडवट शिवसैनिक, ज्यांनी गेल्या विस वर्षापासुन सक्रीय राजकारणात एकनिष्टता जपत प्रत्येक निवडणुकीत शिवसेनेला उभारी देण्यासाठी व पक्षसंघटणवाढी साठी आपल काम केल्याने शिवसेना जिल्हाप्रमुख संतोषभाउ सोमवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली औसा तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाची पंचवार्षिक निवडणुक बिनविरोध पार पडली या निवडणुकीत आपचुंदा गावचे बालाजी सुग्रीव धुमाळ यांनी जिल्हाप्रमुख संतोषभाउ सोमवंशी यांच्या उपस्थीतीत उमेदवारी अर्ज दाखल केला व निवडणुक बिनवीरोध झाली त्यात बालाजी धुमाळ यांना संचालक पदी काम करण्याची संधि मीळाली ,संचालक बालाजी धुमाळ यांनी प्रसारमाध्यमांशी संपर्क केला असता येणार्या काळात खरेदी विक्री संघात आमचे नेते तथा जिल्हाप्रमुख संतोष भाउ सोमवंशी यांच्या मार्गदर्शनात आम्ही शेतकरी हिताचे व शेतकर्यांसाठी काम करणार असल्याचे सांगीतले. यावेळी मा.उपसभापती शेखर चव्हान, मा.उपसभापती कीशोर जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख दिनेश जावळे, मनोज सोमवंशी, गनेश जाधव, डिगंबर सुतार, अत्ताउल्ला शेख, सरपंच विजय खराडे .उपसरपंच रामेश्वर काजे. चेअरमन कमलाकर माने, शाहुराज पाटील, गोविंद सुर्यवंशी .विक्की पाटील, आकाश माने .मुरहारी पाटील, विक्रम पाटील .शिवाजी हजारे, महाविर निदाने.दिपककाका बिराजदार, धनराज चांदुरे, गुरुनाथ बाजुळगे, रोहित माने, योगेश लाखे, प्रभाकर माने सुनिल माने. गनेश माने.प्रसाद पाटील.प्रशांत हजारे, मनोज माने जगन्नाथ जावळे सह आपचुंदा ग्रामस्थ व शेतकर्यांनी अभिनंदनाचा वर्षाव केला.

# राष्ट्रीय नेते नानासाहेब इंदिसे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मूकबधिर व निवासी शाळा येथे खाऊवाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी चे राष्ट्रीय नेते नानासाहेब इंदिसे यांच्या वाढदिवसानिमित्ताने ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे फळ वाटप व मूकबधिर शाळा निवासी शाळा येथे मुलांना खाऊ वाटप प्रमुख उपस्थिती विकीबाबा चौधरी प्रदेशाध्यक्ष आरपीआय एकतावादी रोजगार आघाडी तथा सोलापूर जिल्हाध्यक्ष व नितीन मोरे दहिटणे सरपंच शंकर राठोड आरपीआय एकतावादी बंजारा सेल अध्यक्ष रामभाऊ चव्हाण मोट्याळ सरपंच दिनेश रसनभैरे आरपीआय एकतावादी रोजगार आघाडी अध्यक्ष आरपीआय तम्मा आरपीआय एकतावादी कामगार आघाडी अध्यक्ष चौधरी सोमन्ना बनसोडे आरपीआय एकतावादी रोजगार आघाडी उपाध्यक्ष रवी जानकर आरपीआय एकतावादी रोजगार आघाडी सचिव ताजुद्दीन नदाफ आरपीआय एकतावादी मुस्लिम शहर आघाडीचे अध्यक्ष बालू चव्हाण किनी मोड तांडा बंजारा सेल आरपीआय एकतावादी विभागप्रमुख लिंबाजी कलगुटगी आरपीआय एकतावादी शेतकरी संघटना तालुका दाजी चव्हाण आरपीआय एकतावादी शेतकरी संघटना सचिव दहिटणे विभाग सचिव दहिटणे सागर बरबडे आरपीआय एकतावादी विभागीय दहिटणे अध्यक्ष शेतकरी दिगंबर सालपे आरपीआय एकतावादी चालक वाहक तालुका अध्यक्ष बलभी मधुरकर आरपीआय एकतावादी कामगार दहिटणे विभाग सचिव नामदेव गरडे आरपीआय कलाकार संघटना शहराध्यक्ष स्वामीराव खवळे आरपीआय एकतावादी विभागीय अध्यक्ष कामगार आघाडी महबुब करणे आरपीआय



एकतावादी अपंग शहर अध्यक्ष बाबू राठोड चंदूभाऊ राठोड भवानी तांडा नागणसूर किसन राठोड वालू राठोड अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक बाबासाहेब पाटील विशेष शिक्षक बनसिद्ध कोरे, दिलीप नरवडे, बसवराज आळंद, बसवराज ममदापूरे, हैबत्ती वंजारे, रामदास गुंडगिरे, सुषमा वांगी, संगीता शिंदे, गजानन गाडेकर, सुरेश भोसले हे उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मच्छिंद्र अंगुले सर यांनी केले. आभार मुख्याध्यापक बाबासाहेब पाटील यांनी मानले.

### सहा लाकडी होड्या केल्या नष्ट

### पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली

# अवैध वाळू वाहतूकीवर महसूल व पोलीस प्रशासनाची कारवाई : तहसिलदार सचिन लंगुटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : अवैध वाळू उपसा व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. महसूल व पोलीस प्रशासनाच्या पथकाने चंद्रभागा नदीपात्रात अवैध वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या सहा लाकडी होड्या जेसीबी साह्याने पूर्णपणे नष्ट करण्यात आल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी विविध पथकांची नेमणूक केली आहे. दिनांक ०४ मार्च २०२५ पंढरपूर शहरा नजीकच्या चंद्रभागा नदी पात्रामध्ये अवैध वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या सहा लाकडी होड्या जेसीबी च्या सहाय्याने नष्ट करण्यात आल्या आहेत.




या कारवाईमध्ये मंडळ अधिकारी पंढरपूर विजय शिवशरण, ग्राम महसूल अधिकारी, अमर पाटील, प्रमोद खंडागळे, संजय खंडागळे, महेश कुमार सावंत गणेश पिसे,सचिन चराटे पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी श्री नागणे सहभागी होते.

# पडघा येथे कार्यशाळा व चर्चासत्र संपन्न

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : महिला आर्थिक विकास महांडळ, जिल्हा ठाणे (महाराष्ट्र शासन अंगिकृत) भरारी लोकसंचालित साधन केंद्र, पडघा ता. भिवंडी, जि. ठाणे नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प अंतर्गत माविम मित्र मंडळ यांचे लिंग समभाव संचेतना कार्यशाळा व चर्चासत्र व महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा ठाणे (माविम ) (महाराष्ट्र शासन अंगीकृत) भरारी लोकसंचलित साधन केंद्र पडघा नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प अंतर्गत मालकी हक्क मोहीम कार्यक्रम सी.आर. पी. व कायदा साथी प्रशिक्षण चर्चासत्र दिनांक ५ मार्च २०२५ रोजी भिवंडी तालुक्यातील पडघा ग्रामपंचायत कार्यालय येथे पार पडले.



### स्त्री - पुरुष समानतेचे नागरिकांना दिले धडे

महिलांचे कायदे, हक्क, अधिकार याबाबत अँड कल्पेश पाटील यांनी मार्गदर्शन केले. तर स्त्री पुरुष समानता याबाबत आदेश जाधव यांनी मार्गदर्शन केले. महिलांनी आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी पुढाकार कसा घ्यावा , तसेच समानता याबाबत सी.एम. आर.सी अध्यक्षा रंजुषा जाधव, भरारी लोकसंचालित पडघा केंद्राच्या व्यवस्थापक विद्या गायकवाड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तर कवी पत्रकार मिलिंद जाधव यांनी घरोघरी आता सावित्री हाय कविता सादर केली. यावेळी खानिवलीचे पोलिस पाटील किशोर दळवी, देवळी पोलीस पाटील अशोक पाटोळे, प्रदीप गायकवाड, कमलेश जाधव, नंदकिशोर बजागे, विओ अध्यक्षा दिप्ती पाटील व इतर विओ अध्यक्ष, माविम मित्र मंडळ सी आर. पी. सदस्या, लेखापाल व सहयोगिनी, उपजीविका सल्लागार, पडघा परिसरातील नागरिक उपस्थित होते.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

शनिवार दि. ८ मार्च २०२५


## थोडक्यात...

### कर्ज काढून देतो म्हणत केली फसवणूक

सोलापूर : समाधान नगर येथे व्यवसायासाठी बँकेतून एक कोटी रुपयांचे कर्ज काढून देतो असे म्हणत ८३ हजारांची फसवणूक केल्याचे घटना ऑगस्ट २०२३ ते



आजतागायत घडली. या प्रकरणी फरीद जाफर शेख (वय-५२, रा. सरवदे नगर, मुळेगाव रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून धानेश्वरी समाधान (रा. समाधान नगर व श्याम हब्बू राठोड (रा. प्रताप नगर तांडा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, यातील फिर्यादी हे वरील संशयित आरोपीने संगणमत करून व्यवसायासाठी कर्ज काढून देतो म्हणत कर्जाचे रकमेला ४० टक्के सबसिडी मिळेल असे आमिष दाखवून कर्ज मंजुरीसाठी लागणारी प्रोसेसिंग फी म्हणून ८३ हजार रुपये घेऊन कर्जाचे कोणतेही काम केले नाही. यावेळी फिर्यादीने दिलेली रक्कम मागितली असता त्या दोघांनी फिर्यादीस न वाटणारे धनादेश देऊन फिर्यादीची फसवणूक केल्याचे नमूद आहे.

# आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्ताने बँक ऑफ महाराष्ट्र पंढरपूर येथे स्वयं-सहायता गट क्रेडिट लिंकज कॅम्प

## २५० बचत गटांना १५ कोटींचे अर्थसहाय्य वितरित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आंतरराष्ट्रीय महिला दिन अर्थात स्त्रीत्वाचा उत्सव साजरा करण्याचा दिवस. दरवर्षी ८ मार्च रोजी हा दिवस जगभरात साजरा केला जातो. युनायटेड नेशन्सने ८ मार्च १९७५ रोजी महिला दिन साजरा करण्याची सुरुवात केली होती. हा दिवस खास महिलांच्या समान हक्कासाठी जागरुकता निर्माण करण्यासाठी साजरा केला जातो. यादिवशी महिलांसाठी विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. राजकारणापासून विज्ञान, कला, संस्कृती आणि इतरही विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सन्मान केला जातो. यामुळे या दिनाचे औचित्य साधून पंढरपूर येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखा पंढरपूर च्या वतीने स्वयं-सहायता गट क्रेडिट लिंकज कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला ३०० हून अधिक महिला सदस्यांनी सहभाग नोंदवला.या कार्यक्रमासाठी सुधीर ठोंबरे, प्रकल्प संचालक यांनी उपस्थिती लावली.

या वेळी २५० बचत गटांना १५ कोटींचे अर्थसहाय्य वितरित करण्यात आले. पीक कर्ज नूतनीकरण, व्यवसाय कर्ज परतफेड आणि सुरक्षा विमा याबाबत महिलांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि अटल पेन्शन योजना यांची सविस्तर माहिती देण्यात आली.

बँकेने प्रदान केलेल्या आर्थिक मदतीचा उपयोग महिलांनी स्वतःचा उद्योग उभारण्यासाठी करावा. नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या बचत गटांना बँकेकडून अधिक सहकार्य मिळते, त्यामुळे घेतलेले कर्ज वेळेवर परतफेड करणे आवश्यक आहे.

महिलांनी स्वयं-सहायता गटाच्या कर्जाचा पूर्ण लाभ घ्यावा, असे प्रतिपादन बँक ऑफ महाराष्ट्र, सोलापूर झोनचे झोनल प्रबंधक संजीव कुमार यांनी केले. कार्यक्रम बँक ऑफ महाराष्ट्र पंढरपूर शाखेने आयोजित केलेला कार्यक्रमासाठी बँकेचे वैभव घाडगे, युवराज केदार, निरंजन झिरपे, सचिन चवरे, सुधीर ठोंबरे, महेश गव्हाणे, अजय गौड, रविकिरण शिकारे, गौरव सहरान ,सीताराम देठे ,अमोल नलवडे, सोमनाथ हिंगमिरे आदींचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंढरपूर शाखेचे शाखाधिकारी चंद्रकांत मोरे यांनी उत्तम रीत्या पार पाडले.



# अपहार झालेले चार चाकी वाहनाचा शोध घेण्यात निफाड पोलीसांना यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील रहिवासी कृष्ण पुंडलिक मेधने यांची मालकीचा आयशर गाडी क्रमांक चक १५- गउ - ११ ७० हा वडाळागाव येथील सलमान शेख यांना भाडेतत्त्वावर देण्यात आला होता, महिन्याला गाडीचे हप्ते भरणार, पैसे देणार या बोली प्रमाणे देण्यात आला होता परंतु गाडी मालकाचा विश्वासघात करून बोलीप्रमाणे गाडीचे हप्ते न भरता परस्पर गाडीची विल्हेवाट लावली याबाबत गाडी मालक मेधने यांनी निफाड पोलीस ठाण्यात रीतसर फिर्याद दिल्यानंतर ४९ /२०२५ भादवी का. क.४०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**गाडी मालकाचा विश्वास-घात करून चार चाकी वाहनाची गुजरातला लावली होती विल्हेवाट**

उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ निलेश पालवे ,निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवा. बीएम पवार, पोलीस शि. व्ही.बी जाधव, सारुक्ते, पोलीस पथक्यातील तपासी अंमलदार यांनी गुन्ह्यातील फिर्यादीकडे सखोल चौकशी करून सदर चार चाकी वाहन गुजरात येथील चंनोद ता. वापी, जि.बलसाड येथे असल्याचे समजले.

निफाड पोलिसांनी तात्काळ गुजरात येथे जाऊन सदर चार चाकी वाहनाचा शोध घेऊन तपासाकामी जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे, तपासी अंमलदार पोलीस हवा. बी.एम पवार ,ढिकले, पो. शि. व्ही.बी जाधव ,राजू दरेडे, जाधव, पो. ना. सांगळे यांचे पथकाने अपहार झालेला माल हस्तगत करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे,

## अनधिकृत बांधकामाच्या तक्रारी वीज चोरी करत असल्याचे चित्रीकरण केल्याच्या संशयावरून

# स्नेहा बारवे यांच्यावरील हल्ल्याचा इंदापूरात पत्रकारांनी नोंदवला निषेध


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे

ज्येष्ठ पत्रकार स्नेहा बारवे आणि त्यांचे सहकारी पत्रकार समीर राजे यांना मंचर येथील एका बिल्डरने आणि त्याच्या नातेवाईकांनी अश्लील शिवीगाळ, धक्काबुक्की करत, मारहाण केली असून याबाबत पोलिसांत तक्रार दिल्यास या गुंडांनी पत्रकार स्नेहा बारवे आणि समीर राजे यांना जीवे ठार मारण्याची धमकी देखील दिली आहे, या घटनेने पुणे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून; आंबेगाव तालुक्यात बीडच्या मस्साजोगची पुनरावृत्ती होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मंचर शहरातील एस कॉर्नर परिसरात असणाऱ्या नाविन्य रेसिडेन्सी या इमारतीच्या डेव्हलपरने त्याच्या अनधिकृत बांधकामाच्या तक्रारी केल्याचा संशय, मीटरमधे हेराफेरी, बायपास, वीज चोरी आदी गोष्टी करत असल्याचे चित्रीकरण केल्याचा संशय, तसेच नाविन्य रेसिडेन्सी या इमारतीमधील फ्लॅटची विक्री करून सदर ठिकाणी सोसायटीची नोंदणी न करता सदनिका धारकांची फसवणूक होत असून, ही फसवणूक संबंधित पत्रकार उघड करतात की काय? असा संशय मनात ठेवून संतापून सदर मुजोर बिल्डर यांनी स्नेहा बारवे यांना अश्लील शिवीगाळ, धक्काबुक्की करत जीवे ठार मारण्याची धमकी दिलीये. घटने दरम्यान इसमाने पत्रकार स्नेहा बारवे यांना मारहाण करण्याचाही प्रयत्न केला.





**जनसेवा पत्रकार संघाकडून तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन; कठोर कारवाईची मागणी**

या प्रयत्नात पत्रकार स्नेहा बारवे यांच्या हातावर जोरात फटका देखील बसला आहे.

पत्रकार स्नेहा बारवे यांच्यावरील झालेल्या भ्याड हल्लयाचा महाराष्ट्र राज्य जनसेवा पत्रकार संघटना, इंदापूर तालुका जनसेवा पत्रकार संघाकडून निषेध नोंदविण्यात आला आहे. इंदापूरचे तहसीलदार जीवन बनसोडे तसेच इंदापूर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुर्यकांत कोकणे यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले आहे.

तसेच पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी इंदापूर जनसेवा पत्रकार संघाकडून करण्यात आली आहे.

यावेळी महाराष्ट्र राज्य जनसेवा पत्रकार संघटना, इंदापूर जनसेवा पत्रकार संघटनेचे अध्यक्ष शिवाजी पवार, अतुल सोनकांबळे, महेश गडदे, अशोक घोडके, दत्तात्रय मिसळ, सत्यजित रणवरे, दत्ता पारेकर, संजय शिंदे इ. पदाधिकारी उपस्थित होते.

**महाराष्ट्रामध्ये पत्रकारांवर सतत होत असलेले हल्ले यावर शासन गंभीर दिसत नाही, याबाबत शासनाने ठोस पाऊल उचलावे, जेणेकरून पत्रकारांवर होणारे हल्ले थांबतील. पत्रकार हा समाजाचा आरसा आहे, समाजाचे प्रश्न मांडत असताना काही गाव गुंडांकडून पत्रकारांवर हल्ले केले जातात. अशा घटनांना आळा घालण्यासाठी शासनाने कडक कारवाई करणे गरजेचे आहे.**

**– शिवाजी पवार (अध्यक्ष, जनसेवा पत्रकार संघटना इंदापूर तालुका)**

# जायफळ जिल्हा परीषद शाळेत स्वयंशासन दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा/प्रतिनिधी : औसा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जायफळ येथे स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला . जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जायफळ येथे आज स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी जायफळ शाळेतील विद्यार्थ्यांना स्टीलचे टिफिन वाटप करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमातील बक्षीस निधीतून टिफिनिचे शाळेतील इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना टिफीन वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष प्रकाश दिलीपराव भोंग शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष उपाध्यक्ष सौदागर जोगदंड, महात्मा गांधी तंटामुक्ती समिती अध्यक्ष नीलकंठ तात्या भोंग, शाळेचे मुख्याध्यापक दयानंद सेलूकर यांची उपस्थिती होती.

इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे शिक्षकाची भूमिका पार पाडली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक . दाजीबा बोंदर महेश माळी . गोपीचंद बर्डे, श्रीमती. सविता गिलगिले, श्रीमती संगीता मुकाडे, श्रीमती कल्पना जोगदंड यांनी परिश्रम घेतले.यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांचे जायफळ ग्रामस्थांनी अभिनंदन केले ,



# मेहकर येथे भव्य नॅशनल व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/ बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : तथागत बहुउद्देशीय संस्था, मेहकर द्वारे आयोजित राजमाता माँ जिजाऊ स्वयंसहायता महिला बचत गट, जिवन दिप अनाथ आश्रम व वृध्दाश्रम तसेच तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील कर्तृत्ववान बंधू व भगिनींना, तसेच युवक युवतींनचा नॅशनल पिपल लीडरशीप अँवॉर्ड, राजमाता माँ.जिजाऊ गौरव सन्मान पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार देवून सन्मान करण्यात येणार आहे. आशी घोषणा तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिपभाऊ गवई यांनी केली आहे. येत्या दि.०९/०३/२०२५ रोज रविवार ला वेळ सकाळी ११:३० वाजता स्थळ डॉ बाबासाहेब आंबेडकर वाटिका अशोका भवन येथे आयोजीत करण्यात आला आहे नॅशनल पिपल लीडरशीप अँवॉर्ड, राजमाता माँ.जिजाऊ गौरव सन्मान, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार देण्यात येत आहे. व माजी सैनिक सन्मान तसेच नागरी सत्कार समारंभ ठेवण्यात आला आहे.

आशाच महाराष्ट्रातील विवीध क्षेत्रामध्ये चांगले काम करणार्या बंधू व भगिनींना, तसेच युवक युवतींना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा पुरस्कार सोहळा राबविण्यात येणार आहे. नॅशनल पिपल लीडरशीप अँवॉर्ड,राजमाता माँ.जिजाऊ गौरव सन्मान पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्काराचे गावपातळीवर मेहकर येथे वितरण होणार आहे. यामध्ये सन्मानपत्र, सन्मानचिन्ह ट्राफी, मेडल, पंचरंगीदुपट्टा, असे या पुरस्काराचे स्वरूप ठेवण्यात आले आहे.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे आशा गुणीजनांना

पुरस्कार वितरण व जेष्ठ नागरिक, माजी सैनिक यांचा भव्य नागरी सत्कार समारंभ आयोजित करण्यात येत आहे. तरी सर्वानी या आनंद मोह उत्सवानिमित्त उपस्थित राहावे, आशे आव्हान तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई यांनी केले आहे.



## महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

### महिलेची गंभीर तक्रार - वारंवार छेडछाड, कोणतीच कारवाई नाही!

# कळंब बस डेपोतील वाहतूक नियंत्रकावर विनयभंगाचा गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : प्रतिनिधि: कळंब एसटी बस डेपोतील वाहतूक नियंत्रक कल्याण आत्माराम कुंभार यांच्यावर एका महिला कर्मचाऱ्याने विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. ही घटना समोर आल्यानंतर एसटी विभागात खळबळ उडाली असून, महिला सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

**महिलेची गंभीर तक्रार – वारंवार छेडछाड, कोणतीच कारवाई नाही!**

प्राप्त माहितीनुसार, पीडित महिला (वय ३०) गेल्या दोन-तीन वर्षांपासून कुंभार यांच्या अश्लील वर्तणुकीमुळे त्रस्त होती. ते सतत तिचा पाठलाग करत होते, तसेच वाहतूक कक्षात उपस्थित असताना अश्लील टोमणे मारत होते. महिलांनी याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती, मात्र कारवाई झाली नाही. उलट पीडित महिलेलाच काही दिवसांसाठी निलंबित करण्यात आले होते.

दि. ४ मार्च रोजी रात्री ८:३० च्या सुमारास कळंब बाजार मैदान परिसरात महिला घरी जात असताना आरोपी कल्याण कुंभार यांनी मद्यधुंद अवस्थेत तिचा हात पकडला आणि जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. महिलेने विरोध करून आरडाओरड केली असता, घटनास्थळी जमलेल्या नागरिकांनी आरोपीला पाहिले, मात्र तो पळून गेला. नंतर महिलेने आपल्या पती आणि स्थानिकांच्या मदतीने कळंब पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

**महिलांची सुरक्षा कधी निश्चित होणार?**

**सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेबाबत सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. बस डेपो किंवा कार्यालयीन ठिकाणी महिलांवर होत असलेले अत्याचार रोखण्यासाठी कठोर नियम आणि त्वरित कारवाई होणे गरजेचे आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करून भविष्यात अशा घटना होणार नाहीत, याची दक्षता घेण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.**

**महिला सुरक्षेचा गंभीर प्रश्न – एसटी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

या घटनेमुळे एसटी विभागात महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. जर महिलांच्या वारंवार तक्रारींची दखल घेतली असती, तर कदाचित ही घटना टळली असती. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये कार्यरत महिलांची सुरक्षितता ही अत्यंत महत्त्वाची असून, प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

**पोलिसांचा पुढील तपास सुरू – आरोपीला लवकरच अटक होण्याची शक्यता**

या प्रकरणी कळंब पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या ३५४,(), ५०६ आणि ५०९ कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिस अधिक तपास करत असून, आरोपीला लवकरच अटक होण्याची शक्यता आहे.